**विशेष अधिकारी पदावर दिनांक ३१/१२/२०११ अखेर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची अंतिम सेवाज्येष्ठतासूची प्रसिध्दीबाबत.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
क्र. प्रशा/७/कावि/१३८६/२०१२
दिनांक २४/१२/२०१२

वाचले :-

१. आदेश क्रमांक प्रशा/७/कावि/९३६/२०१२ दिनांक २४/०९/२०१२ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली विशेष अधिकारी पदाची दिनांक ३१/१२/२०११ अखेरची प्राथमिक स्वरुपाची सेवाज्येष्ठता सूची

२. श्री.माछरे सुभाष सावन, विशेष अधिकारी यांचा दिनांक १२/१०/२०१२ चा आक्षेप.

३. संबंधित शाखाप्रमुखांकडून प्राप्त झालेले विशेष अधिकारी पदावरील अधिकाऱ्यांचे स्वाक्षांकित पुर्तता अहवाल.

४. प्रशासन विभागाकडील दिनांक २२/१२/२०१२ चा मान्य प्रस्ताव

## आदेश

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर विशेष अधिकारी पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची दिनांक ३१/१२/२०११ अखेरची प्राथमिक सेवाज्येष्ठता सुची वाचले १ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. सदरच्या प्राथमिक ज्येष्ठतासूची मधील नमुद अधिकाऱ्यांचे नावाबाबत जात, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, सेवाज्येष्ठता क्रम अथवा सेवाज्येष्ठता सूचीमध्ये नाव नसले बाबत काही आक्षेप असल्यास त्या बाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करुन ही प्राथमिक ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत संबंधित विभागीय शाखाप्रमुखांमार्फत योग्य त्या पुराव्यासह सादर करणे बाबत कळविणेत आलेले होते.

प्रस्तुत प्राथमिक सेवाज्येष्ठता सूचीवर उपरोक्त वाचले क्रमांक २ अन्वये आक्षेप प्राप्त झालेले असून याआक्षेपांवरील निर्णय पुढील प्रमाणे देणेत आलेले आहे.

### अ) शैक्षणिक अर्हताबाबत आक्षेप-

श्री.माछरे सुभाष सावन, विशेष अधिकारी यांनी वाढीव शैक्षणिक अर्हतेची नोंद घेणेबाबत दाखल केलेला आक्षेप शाखाप्रमुखांच्या शिफारशी व अर्हतेचे दाखले पाहून मान्य करण्यात आले आहे. तरी उपरोक्त सर्व मान्य आक्षेपाच्या यथार्थ नोंदी अंतिम सेवाज्येष्ठता सूची मध्ये घेण्यात येत आहेत.

अशाप्रकारे उपरोक्त आक्षेपावर निर्णय घेणेत आला असून विशेष अधिकारी पदाची प्राथमिक सेवाज्येष्ठतासूची सर्व संबंधित अधिकाऱ्यांना बजाविले बाबत वाचले ०३ अन्वये स्वाक्षरीसह संबंधित शाखाप्रमुखांकडुन प्राप्त झालेले पुर्तता अहवाल व उपरोक्त देण्यात आलेल्या निर्णयांस अधिन राहून तसेच मा.आयुक्त सो यांचे कडिल परिपत्रक क्र. प्रशा/७/कावि/६५/२०१२ दिनांक १९/०१/२०१२ अन्वये कळविले प्रमाणे अधिकाऱ्यांना सेवाज्येष्ठतासुचीची प्रत मिळाली नसल्यास किंवा मुदती नंतर आक्षेप दाखल केल्यास अशा आक्षेपांचा विचार न करता अंतिम स्वरुपात सेवाज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येवून प्रसिध्द केलेल्या अंतिम यादीवर अधिकारी/कर्मचारी यांनी हरकत घेतल्यास किंवा मे. न्यायालयात दावा दाखल केल्यास याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील त्यानुसार विशेष अधिकारी पदाची दिनांक ३१/१२/२०११ अखेरची प्राथमिक सेवाज्येष्ठतासूची या आदेशान्वये अंतिम स्वरुपात प्रसिध्द करणेत येत आहे.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रति,

संबंधित अधिकारी

प्रत,

१. संबंधित शाखाप्रमुख

२/- सोबत <u>**विशेष अधिकारी**</u> पदाची सेवाज्येष्ठता सूची ची प्रत संबंधितांना बजाविणेकामी पाठविणेत येत आहे. प्रस्तुत सूची संबंधितांना बजावून तसा पुर्तता अहवाल आठ दिवसात सादर करावा.

२. लेखाविभाग

३. मुख्य लेखापरिक्षण विभाग

४. प्रशासन टेबल क्रमांक १, १२, १३

५. प्रशासन संगणक कक्ष

योग्य त्या नोंदी कामी

प्रशासन अधिकारी (तपासणी)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

विशेष अधिकारी पदाची दिनांक ३१/१२/२०११ अखेरची अंतिम स्वरुपाची सेवाज्येष्ठता सूची

वेतनश्रेणी :-९,३००-०-३४,८०० ग्रेड वेतन :- ५४००

| अ.क्र | संगणक क्र | अधिका-याचे नाव | जात | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | विशेष अधिकारी रुजु तारीख | मनपामध्ये कामास लागलेची पद | मनपामध्ये कामास लागलेची तारीख | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २१ | माछरे सुभाष सावन | कंजारभाट | विमुक्त जाती (अ) | बी.कॉम., एल.एल.बी., एल.एस.जी.डी., एल.जी.एस., एल.एल.एम., डी.एल.एल.एल.डब्ल्यु, Advanced Post-Graduate Diploma in Urban Management (APGDUM) | ०१/०१/१९५९ | १८/१२/२००७ | लिपिक | १७/०७/१९८२ | ३१/१२/२०१६ | |

प्रशासन अधिकारी, तपासणी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८